बा. वा.
2800

BVBK-0402470

का-वा
२७५०
७।८।९०

केंद्र शासन आणि राज्य शासन यानी बक्षिसे देऊन गौरविलेली पुस्तके –

# सोनपंखी

## भाग – २

## सुमति पायगांवकर

क्र. २७५० दिनांक ७।८।९०
का-वा

अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३९७ नारायण पेठ,
पुणे ३०

प्रकाशक :-
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी प्रकाशन
३१७, नारायण पेठ,
दै. प्रभात समोर, पुणे - ३०
फोन - ४४९५४१

©सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशन दिनांक :-
२६ जानेवारी १९८९ / २४ डिसेंबर १९८८

मुद्रक :-
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी प्रकाशन
३१७, नारायण पेठ,
दै. प्रभात समोर,
पुणे - ४११ ०३०
फोन - ४४९५४१

मूल्य - १२/- रु.

भाग २ रा


| | | |
|---|---|---|
| ७) | आई हवीय देवा | ४८ |
| ८) | मोहन | ५७ |
| ९) | वर्षाराणी | ६४ |
| १०) | चमेली | ७१ |
| ११) | ताई न् भाऊ | ७८ |
| १२) | सोनपंखी | ८४ |


# सोनपंखी

*भाग १ वरून क्रमशः पुढे चालू*



## ७ आई हवीय् देवा !

सकाळचे साडेदहाच वाजले आहेत पण बारा वाजून गेल्यासारखें भासत आहे. ऐन वैशाखांतलें ऊन आहे आणि जिकडे तिकडे भयंकर तापलें आहे. पक्षीसुद्धां पानांच्या सावलींत नि तेवढाच गारवा म्हणून झाडांच्या फांद्याफांद्यांतून स्वस्थ बसून आहेत.

रस्त्यावर माणसांची आणि वाहनांची येजा मात्र सारखी चालू आहे. बोलून चालून ऑफिसला आणि कामधंद्याला जाण्याची वेळ आहे. फक्त मुलेंच शाळांत किंवा कॉलेजांत जातांना दिसत नाहींत. उन्हाळ्याच्या रजा आहेत.

अशाच एका वेळीं एक लहान मुलगा एका सुटाबुटांतल्या गृहस्थाला विचारतो आहे, " साहेब, पॉलिश ? बूट पॉलिश करून देतों न."

त्या गृहस्थानें, काय कटकट म्हणून मागें वळून पाहिलें. एक सुमारें दहा–अकरा वर्षांचा दिसायला चांगला नि तरतरीत मुलगा त्याच्याकडे केविलवाणा बघत होता. डोळ्यांतलीं आसवें खुशाल गालांवर ओघळत होतीं. अंगांतले कपडे फाटके होते आणि खांद्यावर मळकट कळकट छोटी पिशवी होती.

हुंदका देत तो मुलगा पुन्हा विचारत होता, " सा—आ––हे––ब ! पॉलिश कह्—कह्—रूऽ ? "

तो सुटाबुटांतला गृहस्थ थबकला.

" अरे पण तूं रडतोस कां ? रडत कां विचारतोस ? ही नवी रीत कीं काय ? " तो म्हणाला.

शेवटचें वाक्य त्या मुलाला नीट समजलें नाहीं नि त्याचें लक्षहि नव्हतें. त्याला आणखीनच हुंदका आला. तो हुंदके देत डोळे पुसत म्हणाला,

" मला आजोनं हांकलून दिलं. मला पुष्कळ पैसे मिळत नाहींत म्हणते ती—" पुढें त्याच्यानें बोलवेना. आपल्या फाटक्या शर्टानें डोळे पुसत तसाच उभा राहिला तो.

तो गृहस्थ आश्चर्यांत पडला. ' याचें म्हणणें खरें कीं खोटें ? '

हल्लींच्या भिकाऱ्यांच्या तऱ्हतऱ्हेच्या युक्त्याहि त्यानें ऐकल्या होत्या. त्याला शंका आली.

' त्यांनींच पाठविलेला हा असेल ? '–ही शंका मनांत आली, पण क्षणभरच ! त्या मुलाचा चेहरा कमालीचा सुक-

लेला होता, कमालीचा दीन ो ा, डोळे भाबडे होते—निर्मळ होते.

" चल माझ्या बरोबर माझ्या ऑफिसांत—" इतकें म्हणून तो गृहस्थ पुढें चालूं लागला. तो मुलगाहि शर्टाच्या बाहीनें डोळे पुशीत पुशीत त्याच्या मागेंमागें निमूटपणें चालूं लागला.

गृहस्थ ऑफिसांतल्या आपल्या खोलींत शिरला. तो पोरहि मागोमाग खोलींत शिरला. साहेबांच्या मागोमाग हें शेंबडें पोर कोण म्हणून इतर कारकून व शिपाई मंडळी चेहऱ्यावर प्रश्नार्थक चिन्ह चढवून एकमेकांकडे पाहूं लागली.

गृहस्थानें आपला कोट काढून ठेवीत विचारलें,

" हं ऽ--नीट सांग पाहूं सगळं. कुठें राहते तुझी आजी ? कां हांकलून दिलं तुला ? वडील कुठं आहेत ? नांव काय तुझं ? "

त्या मुलाच्या डोळ्यांत पुन्हा पाणी तरारलें.

" माझं नांव छोटू. माझे बाबा गेल्याच वर्षी वारले. म्हणून तर साहेब!—ही आजी आहे ना—ती माझ्या बाबांची काकू आहे. आमच्याचकडे असायची. ती मला रोज मारते. मला पेपर वीक म्हणते–बूट पॉलिश कर म्हणते. पेपरवाला पांच रुपये ' डिपिशिट ' मागतो तर देत नाहीं–म्हणून मी बूट पॉलिश करतो तर--" छोटूला पुन्हां जोराचा हुंदका आला.

त्या गृहस्थानें त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें,

" रडूं नकोस असा. नीट सांग बघूं सगळं. " छोटू डोळे पुशीत, हुंदका आवरीत बोलूं लागला,

" मी लहान होतों तेव्हांच माझी आई गेली. मला

थोडीशी आठवते ती. माझ्यावर खूप माया करायची-ती. मला भरवायची, माझे लाड करायची, मला खाऊ द्यायची. ती गेल्यावर मग मला बाबांनीं शाळेंत घातलं. गेल्यावर्षी बाबा गेले तेव्हां मी पांचवींत होतों. माझे गुरुजी पण मला कधीं रागावत नव्हते. बाबा एकाएकीं गेले. छातींत कळ आली नि गेले. बाबा वारले नि आजीनं मला शाळेंतून काढलं. मला ती कामधंदा कर म्हणते. हमाली कर म्हणते. मी बूट पॉलिश करतो पण मला गिऱ्हाईकच मिळत नाहीं. मोठीं मुलं मला दम भरतात, मारतात अन् माझं गिऱ्हाईक आपणच घेतात." पुन्हां तो रडवेला झाला.

तो गृहस्थ म्हणाला,

"मी घालूं तुझ्या आजीची समजूत ? चल तुझ्या आजी-कडे. मी तुझ्याशीं नीट वागायला सांगेन तिला."

"नको, नको. नको साहेब. ती वाईट आहे. ती मारील मला. तुम्ही परत आल्यावर मारील. मला पैसे मिळाले नाहींत कीं ती मला खूप मारते. मी तुमच्या घरीं नोकरी करीन. सांगाल तें काम करीन. ती मला उपाशीं ठेवते. कधीं कांहीं देत नाहीं. कध्धीं कध्धीं जवळ घेत नाहीं." छोटू जोरांत हुंदके देत होता.

हुंदके आवरत तो पुन्हां म्हणत होता,

"मी तुमच्या घरीं येतो. मी सगळं काम करीन तिथें पण मला आजी नको--तीं बूट पॉलिशवालीं मुलं नकोत साहेब."

तो गृहस्थ हतबुद्ध झाला. त्यानें मग ठरवलें, निदान कांहीं दिवस तरी या मुलाला घरीं न्यावें, दहा अकरा वर्षांचा तर मुलगा ! मग त्याच्या आजीला शोधून त्याला तिच्या स्वाधीन करावें. तिची नीट समजूत घालावी. पोलिसांच्या हवाली करून त्याचे हाल करण्यांत काय अर्थ ? "

त्यानें छोटूला शांत व्हायला सांगितलें. आपल्या घरीं घेऊन जाण्याचें आश्वासन दिलें आणि त्याच्यासाठीं खायला मागवलें.

सारा दिवस छोटू तिथेंच बसून होता. मधेंच त्याला हुंदका येई. मधेंच त्या गृहस्थाकडे तो टक लावून पाही. मधेंच आपल्या हातापायांचीं नखें कुरतडत राही.

संध्याकाळ झाली. तो गृहस्थ छोटूला आपल्या बरोबर घेऊन गेला. घरीं येतांच तो आपल्या बायकोला म्हणाला,

" आज हें एक नवीन माणूस आणलंय मीं आपल्याकडे. निदान कांहीं दिवस तरी राहील आपल्याकडे. " इतकें म्हणून त्यानें छोटूकडे बोट दाखविलें आणि सबंध हकीकत तिला सांगितली. तिच्या उत्तरासाठीं त्यानें तिच्याकडे पाहिलें. ती शांतपणें म्हणाली,

" ठीक आहे. निदान कांहीं दिवस ठेवून तर पाहूं. मला-सुद्धां घरांत हाताखालीं कोणी लागतंच. हें दे, तें दे, बाजारांतून हें आण-तें आण हें काम करायला कोणीतरी हवंच होतं. शिवाय त्याला लिहिणं वाचणं येतंच आहे. तेव्हां चांगला उपयोग होईल त्याचा. "

त्या दिवसापासून छोटू त्या घरांत राहूं लागला. सकाळ-पासून संध्याकाळपर्यंत त्याला झेंपणारें सर्व काम तो करीत राही. घर झाडून पुसून लख्ख ठेवी, बाजारहाट करी, कप-ड्यांच्या घड्या करी, कपबश्या भांडीं धुऊन साफ करी, भाजी निवडी, सर्व जोडे स्वच्छ करून पॉलिश करी. इतर अनेक कामें करी. त्याच्या मालकानें व मालकिणीनें सांगितलेलें प्रत्येक काम करी. छोटू मालकाला दादासाहेब म्हणे, मालकिणीला

बाईसाहेब म्हणे. दादासाहेबांना एकच मुलगी होती. त्याच्यापेक्षां एखाद्या वर्षानें मोठी. तिला तो ताईसाहेब म्हणे.

ताईसाहेबांचीं पुस्तकें आवरणें, अभ्यासाचें टेबल आवरणें, हें तो मन लावून करी. आणि हें सगळ्यांचें सगळें काम तो फक्त एकाच गोष्टीसाठीं करी—

त्याला कोणी मारूं नये—उणें, वेडेंवाकडें बोलूं नये आणि—मायेचा शब्द मिळावा—मायेचा एखादा तरी शब्द! एकाच गोष्टीसाठीं तो तळमळत होता.—मायेचा हात——मायेचा शब्द !

छोटू अवघ्या पंधरा दिवसांतच त्या तिघांचा अतिशय आवडता झाला आणि आतां त्या तिघांना वाटूं लागलें,

'हा पुन्हा आपल्या आजीकडे गेला तर? न जाईल तरच चांगलें! आणि त्या सर्वांच्याच सुदैवानें छोटूची आजी त्याचा तपास करीत कधीं आली नाहीं. तो रोज नियमीतपणें आपलें काम अगदीं उत्साहानें करी. स्वच्छ–निर्मळ. बाईसाहेब जेव्हां ताईसाहेबांचे लाड करीत, त्यांना नवे कपडे व नव्या जिनसा आणीत त्यांच्याशीं प्रेमळ शब्दांत बोलत, तेव्हां छोटू डोळे भरून त्या मायलेकींकडे पाहात राही. त्याच्या अंतःकरणांत खोल—अगदीं खोल कुठें तरी कांहीं कालवें. त्याला भडभडून येई—हुंदका येई आणि वाटे——

आपण एकटें——अगदीं एकटें आहोंत !

कोणीच ?——कोणीच नाहीं आपलं ?

बाईसाहेब ताईसाहेबांना कधीं कांहीं कारणानें रागावत. पण तें रागावणेंहि छोटूला गोड वाटें. त्यांतली तळमळ त्याला जाणवे. ताईसाहेब रुसून बसत, पण छोटू आपलें काम अधिक चांगलें करण्याचा प्रयत्न करी. जणूं बाईसाहेब त्यालाच

रागावल्या होत्या नि त्यांना खूष करण्यासाठीं आपलें काम जास्त चांगलें करण्याचा तो प्रयत्न करीत होता असेंच कोणाला वाटावें.



आज घरांत गडबड होती. ताईसाहेबांचा वाढदिवस होता. रविवार असल्यामुळें दादासाहेबहि घरांतच होते. ताईसाहेबांच्या मैत्रिणींना संध्याकाळीं चहाफराळाला बोलावलें होतें. खेळायला बोलावलें होतें. दादासाहेब व बाईसाहेबांनीं दिवाणखाना सजवला होता. ताईसाहेबांनीं नवे कपडे घातले होते. सँडलस् घातल्या होत्या. नवी अंगठी घातली होती. घरांत छान छान खायला केलें होतें. कांहीं बाहेरचेंहि मागवलें होतें. सारा दिवस बाईसाहेबांची खूप गडबड चालू होती. छोटूचीहि गडबड चालू होती. त्याला नवा शर्ट व नवी पँट दिली होती. तो

आज नेहमींपेक्षां जास्तच तरतरीत दिसत होता. जास्तच हौसेनें काम करीत होता.

ताईसाहेबांच्या मैत्रिणी आल्या. त्यांनीं छान छान भेटी आणल्या. त्यांनीं छान छान गाणीं म्हटलीं. छान छान पदार्थ खाल्ले. त्या खूप खेळल्या आणि काळोख पडल्यावर आपापल्या घरीं गेल्या. दादासाहेब त्यांना पोहोंचवायला गेले. ताईसाहेबहि त्यांच्या बरोबर गेल्या.

बाईसाहेबांना आतां पसारा आवरायचा होता. स्वयंपाकघरांतलेंहि आवरायचें होतें.

स्वयंपाकघरांत जातांच त्यांना पटकन् आठवण झाली. त्या स्वतःशींच म्हणाल्या,

" अरेच्या, त्या मुलींच्या नादांत छोटूला खायला द्यायचं राहुयलंच ! बिचारा ! "

त्यांनीं घाईघाईत एका मोठ्या बशींत सगळे पदार्थ वाढले. विसरल्याची भरपाई करण्यासाठीं भरपूर वाढले. त्यांनीं त्याला हांक मारली.

पण छोटू तिथें नव्हताच ! जिन्याच्या खालीं, पलीकडे, एका लांकडी पेटीवर छोटूची नेहमींची बैठकीची जागा होती. त्याला बोलावण्यासाठीं बाईसाहेब लगबगीनें तिथें गेल्या. पण ?—पण स्तंभितच उभ्या राहिल्या !

छोटू पाठमोरा, पेटीपुढें हात जोडून उभा होता. पेटीवर, संध्याकाळीं देवापुढें लावलेलें निरांजन आणून ठेवलें होतें. किती सुंदर तेवत होतें तें ! एका छोट्याश्या खड्यावर—दगडावर दोन मोगऱ्याचीं फुलें व बेलाचें पान होतें. छोटूच्या डोळ्यांतून घळघळां आसवं ओघळत होती. तो दाटल्या गळ्यानें म्हणत होता,

" देवा, ताईसाहेबांना खूप चांगलं चांगलं दे–खूप चांगलं चांगलं दे. आणि मला ? मला ? पेटीवरल्या दगडापुढें डोकें टेकीत हुंदक फुटून गदागदा हालत तो म्हणाला,

" मला–मला आई हवीय–देवा ! आई हवीय्–देवा ! "

अगदीं गद्‌गदून, ओठ दाबून रडत होता तो.

बाईसाहेब पुढें वांकल्या. आंसवें ओघळत होतीं त्यांच्याहि डोळ्यांतून. त्यांनीं छोटूला पटकन् उचललें. पोटाशीं घट्ट धरलें. कुरवाळलें.

" मी आहें रे बाळा ! –मी आहें तुझी आई. " त्या म्हणाल्या.





## ८ मोहन

मुंबई शहराच्या एका भागांतील एक लांबलचक चौमजली चाळ. वस्ती मध्यमवर्गीय पांढरपेशा लोकांची दिसत होती. स्त्रिया व मुलांनीं गॅलऱ्या खच्चून भरल्या होत्या. स्त्रिया आपल्या पदरांनीं डोळे पुसतांना दिसत होत्या. माझें एकदम लक्ष वेधलें त्या दृश्याकडे.

इतक्यांत चाळीच्या मोठ्या दरवाजांतून अनेक लोक बाहेर

पडले. शुभ्र कपडे घातलेले व डोक्यावर कांहींहि नसलेले ! कोणाची तरी अखेरची यात्रा होती ती.

मी आश्चर्यानें क्षणभर तिथंच थबकलों—कोण असेल तें ?—कोणीतरी ४२ च्या लढ्यांतला पुढारी ?—अनेकदां तुरुंगवास भोगलेला स्वातंत्र्ययुद्धांतला वीर ?—एखादा समाजकार्य-कर्ता ?—कीं एखादा महान् साधुपुरुष ?—कोण तें ?

बाजूच्याच दुकानांत मीं चौकशी केली—"कोण ?"

दुकानदारानें डबडबलेल्या डोळ्यांनीं, सद्‌गदित आवाजांत उत्तर दिलें, "अवघा एक सोळा वर्षांचा मुलगा !"

"बिचारा ! पण त्याचा एवढा विशेष सन्मान कशासाठीं ? एवढ्या लहान वयाच्या मुलानं विशेष तें काय केलं ?" मीं अर्धवट कुतूहलानं, अर्धवट हळहळून विचारलं.

"विशेष !" दुकानदार पटकन् उद्‌गारला, "अहो, देवदूतच होता हा मुलगा. साऱ्यांचीं कामं करायचीं, घरोघरीं कांहीं ना कांहीं मदत करायची, दुसऱ्यांच्यासाठीं मेहनत करायची हेंच तर त्या थोर मुलाचं रोजचं काम ! आणखी याहून विशेष काम तें काय ? खरे पुढारी यांना म्हटलं पाहिजे. सगळीं मुलं अशीं झालीं तर !"

इतकें बोलणें होईतों यात्रा बरीच पुढें गेली होती. मी दुका-नाशींच अधिक रेंगाळलों. इतक्यांत एक म्हातारा माणूस त्या यात्रेंतून दुकानांत परत आला. 'हुश्श' करून क्षणभर त्यानें मजकडे पाहिलें. खालीं बसत तो उद्‌गारला,

"देवमाणूस होता बिचारा. देवानं अशा माणसांना खूप आयुष्य द्यायला हवं. पण देवाघरचं सारंच न्यारं !"

त्या म्हाताऱ्यानें उसासा टाकला. मग माझ्याकडे पाहून तो

पुढें बोलूं लागला, "अहो साहेब, आठदहा वर्षंच झालीं असतील हा मुलगा नि त्याचे आईबाप इथं राहायला आले. गरीब कुटुंब होतं बिचारं, पण फार भलीं माणसं!--फारच भलीं! या मुलाचे वडील पुढें लौकरच अगदीं अकस्मात् गेले--दैवयोग! या मुलाच्या आईनं एकटीनं बिचारीनं सारं सावरलं. कोणाचं शिवणकाम कर, कोणाकडे स्वैंपाकाची नोकरी धर, कोणाचीं पापड-लोणचीं करून दे, असं आजपर्यंत सांभाळलं." म्हातारा जरा थांबला.

"हा मुलगा मूळचाच गुणी." त्यानें बोलणें चालू केलें--"पहाटे रोज तो वर्तमानपत्रं विकायचा, आमच्या चाळींतच केवढीं तरी लागतात. चाळींतल्या सर्वांच्याकडे तो जायचा.



कोणाची भाजी आणून दे, कोणाचे परटाचे कपडे आणून दे, कोणाचीं इतर अनेक कामं करून दे--अशा त्याच्या गुणांमुळें तो सर्वांचा फार आवडता झाला होता...."

" पण याचा इतका सन्मान एवढ्यासाठींच केला ?" मीं विचारलें.

" छे, छे, अहो तेंच तर सांगतों. या मुलाची वागणूकच निराळी. आपल्याहून मोठ्या मुलांचीं भांडणं हा लहानसा मुलगा मिटवायचा. अगदीं छोट्या छोट्या मुलांना गोळा करून त्यांना खेळवायचा, गोष्टी सांगायचा, गाणीं शिकवायचा. संध्याकाळ झाली कीं, जिन्यापुढच्या चौकांत विजेच्या दिव्या-खालीं त्यांची सभा भरे. मग तिथं शुभं करोति, श्लोक, पाढे सारं कांहीं मोठ्या आनंदांत चालायचं. साडेसांत वाजले कीं, सारीं मुलं मग पांखरांसारखीं भुर्रर्र आपापल्या घरीं जात. हाच पोंचवी त्यांना घरोघर. वेडेवांकडेपणा त्याच्या गांवींहि नव्हता कधीं." म्हातारा विषण्णपणें कुठेंतरी दूर बघत क्षणभर थांबला.

मीं विचारलं, " नांव काय होतं या मुलाचं ?"

" याचं नांव सांगायचं विसरलोंच." म्हातारा चटकन म्हणाला. " याचं नांव मोहन होतं–मोहन ! आणि प्रत्येकावर जशी मोहिनीच घातली होती त्यानं. आईनं त्याला त्या म्युनिसिपालिटीच्या शाळेंत घातलं होतं. पहिला नंबर कधींच सुटला नाहीं त्याचा." म्हाताऱ्यानं एक सुस्कारा सोडला.

मी म्हणालों, " एकूण हा अतिशय गुणी मुलगा होता आणि अशीं मुलं फार क्वचित्, असंच ना म्हणायचंय् ? पण त्याचा एवढा सन्मान करण्याजोगं खास असं काय असेल ?"

" अहो, तेंच सांगतो. पुढें हा मुलगा जरा मोठा झाला. तो घरोघरीं जाऊन मुलांना अभ्यासांत मदत करी. एक भलं मोठं अभ्यासमंडळच स्थापन झालं आमच्या चाळींत; आणि प्रत्येक मजल्यावरला एक मोठासा मुलगा त्या अभ्यासमंडळाचा

आपल्या मजल्यापुरता व्यवस्थापक असायचा. यामुळें झालं काय ! मुलं नापास व्हायचींच बंद झालीं. त्यांना एकमेकांचा धाक वाटूं लागला. कोण जास्त मार्क मिळवितो ही चुरस वाढली. आणि मुलांत फार असतं हें. पण या मोहनची फार मोठी कामगिरी तर निराळीच आहे."

"कोणती कामगिरी !" मीं विचारलं.

म्हाताऱ्यानें आपलें बोलणें चालू केलें, "प्रत्येक घरांत कोणीहि आजारी पडलं कीं, मोहन त्याच्या उशाशीं बसायचाच. आमच्या चाळींत कांहीं बायका बिचाऱ्या अगदींच साध्या-भोळ्या. सैंपाकपाणी, घरकाम आणि इतर मुलांचं उरकतांना सारा वेळ आजाऱ्याकडे पाहायला जमणं ही का सोपी गोष्ट ? या आजाऱ्यांचीं कामं मोहन एकटा करी. वेळच्या वेळीं औषधं देणं, डॉक्टरकडे जाणं, अंथरूण साफ करणं, असलीं कामं तोच उरकी. तो डॉक्टरकडे किंवा शाळेंत गेला कीं, आपल्या आईला आजाऱ्याकडे पाहायला सांगे. तिच्या हातून पेजपाणी करवी. आणि कल्पना करा, अशा शुश्रूषेमुळं घरांतल्या माणसांना केवढं हलकं वाटत असेल ! खुद्द आजाऱ्याचा आजारच जास्त दिवस राहील कशाला ?

आजाऱ्याची शुश्रूषा करणं हा अलीकडे त्याचा धर्मच झाला होता. अहो, एवढी मोठी चाळ. कोणी ना कोणी लहानमोठं आजारी असायचंच. प्रत्येक कुटुंबांत त्याची वाखाणण्यासारखी मदत असायची—या बाबतींत नाहींतर त्या बाबतींत ! सगळी-कडे पैशानंच का गोष्टी होतात ?—माणुसकी आणि जिव्हाळा हीं तर आधीं पाहिजेत. मोहन म्हणजे जिती जागती माणुसकी होती !—जिता जागता जिव्हाळा—अगदीं जिता जागता !—टायफॉईडनें गेला आज बिचारा—या चाळीचा प्राणच गेला."

त्या म्हाताऱ्याचा घसा दाटून आला. त्यानें आपले डोळे पुसले, व पुढें म्हणाला,

"आजकाल अशीं मुलं सांपडतात कुठं ? मोठीं माणसं-देखील थक्क व्हायचीं त्याचं काम पाहून. कोणी फार आजारी असलं कीं, रात्रीं जागरणंहि करायचा; आणि नंबर जाऊं नये म्हणून हातांत पुस्तकदेखील असायचं–तेवढ्याच २–४ ओळी वाचून व्हायच्या.

आणि त्याची आईसुद्धां फार मेहनती अन् प्रेमळ माउली. गरिबींतदेखील मुलाच्या या थोर कामांत कधीं अडथळा आणायची नाहीं. पण हीं दोघं कधीं कोणाचीं मिधीं नव्हतीं–छे, कधींच नाहीं ! आपलं जेवणखाण आपल्या घरीं आपल्या पैशांवर. अहो, अशा माणसांना का कोणी जेवूं घातलं नसतं ? –पण भारी मानी नि करारी होता मोहन !"

"टायफॉईडमधें गेला का मोहन ? किती दिवस आजारी होता ?" मीं मधेंच विचारलं––"लोकांनीं खप प्रयत्न केले असतील त्याच्यासाठीं? खूप मदत केली असेल. तरीहि गेला?"

म्हातारा आवेगानें म्हणाला, "मदत ?अहो, सर्वांचा जीव कीं प्राण होता मोहन ! पण त्याचं असं झालं. तिसऱ्या मजल्यावर त्याच्याच एवढा एक मुलगा आजारी पडला–त्याच्याच वर्गांतला–त्याचा मित्र. टायफॉइड झाला होता–आणि एकाएकीं फारच बिघडली त्याची प्रकृति ! मोहननं सतत जागरणं केलीं मित्रासाठीं. फार शुश्रूषा केली. पुढें मोहनला ताप आला पण त्यानें तो अंगावर काढला. कारण त्याच्या मित्राची स्थिति फार वाईट होती. दोन दिवसांनी मित्र सुधारला आणि मोहन जास्त आजारी झाला. डॉक्टरांचा उपाय चालला नाहीं.

लोकांच्या मुलासाठीं आणि मित्रासाठीं प्राणसुद्धां अर्पण केले बिचाऱ्यानं ! –आज चाळ उघडी पडली आमची ! ”

म्हातारा क्षणभर थांबला. घसा दाटून आला होता त्याचा.

“ सारीं कुटुंबं उघडीं पडलीं ! –साऱ्या पोरांचा आधार गेला–सर्वांचाच आधार गेला–प्राणच गेला. ” तो कसाबसा म्हणाला.

मी हतबुद्धपणें त्याच्याकडे पाहात होतों. माझ्याहि डोळ्यांत तरारणारीं आंसवं माझीं मलाच कळलीं नाहींत.





९


# वर्षाराणी

डोंगरांच्या मोठाल्या रांगा होत्या.
त्यांत एक उंच नि मोठा डोंगर होता.
खूपच उंच होता तो.
त्याच्या एका कपारींतून—
एक चिमुकला झरा वाहात होता.
अगदींच चिमुकला !
उन्हाळा फारच भासत होता.

सारें रान करपून निघालें होतें.
चिमुकला झरा कसाबसा वाहतच होता!
मोठ्या नेटानें—मोठ्या धैर्यानें!
उन्हामुळें पाणी आटेल कीं काय?—
किती भीति वाटत होती त्याला!
इतक्यांत—
वर्षाराणी आकाशांत सडा शिंपायला आली.
काळे मोठाले घडे होते तिच्या कमरेवर नि हातांत.
अनेक पऱ्या देखील होत्या तिच्याबरोबर.
त्यासुद्धां काळे मोठाले घडे घेऊन इकडे तिकडे फिरत होत्या.
वर्षाराणीच्या मैत्रिणी होत्या त्या साऱ्या.
आकाशाचें अफाट अंगण शिंपायचें होतें त्यांना.
कारण होतें त्याला.
देवांच्या घरीं आतां सण यायचे होते—
उत्सव येणार होते!
आषाढी एकादशी येणार होती.
नागपंचमी नि राखी पौर्णिमा येणार होती.
कृष्णजन्माचा नि गोकुळअष्टमीचा उत्सव होता.
गणेशचतुर्थीचा उत्सव होता!
वर्षाराणीची केवढी गडबड!
सारें आकाश शिंपून पूर्ण करायचें होतें.
जागोजागीं विजेच्या रांगोळ्या काढायच्या होत्या—
तऱ्हेतऱ्हेच्या नि सुरेख सुरेख!
आपले घडे सांवरीत वर्षाराणी डोंगरमाथ्यावरून जाऊं लागली.
इवल्या झऱ्यानें हळूच हांक मारली—

" वर्षाराणी ! "
कोण हांक मारतंय ? "
वर्षाराणीनें चमकून इकडे तिकडे पाहिलें.
" मी ! मी हांक मारतोंय.
एक छोटा झरा. " झऱ्यानें उत्तर दिलें.
" काय हवंय रे ? सांग ना पटकन.
खूप कामं आहेत मला अजून. " वर्षाराणी म्हणाली तोऱ्यांतच !
" किनई वर्षाराणी,
तुझे दोनचार घडे माझ्या पण अंगावर ओत ना. "
झरा भीत भीत म्हणाला.
" आणि काय होईल मग ?
जाशील एखाद्या दरींत वाहात--
नि होशील गडप--" वर्षाराणी तुच्छतेनें म्हणाली.
" नाहीं ग. मी किनई मुळींच तसं नाहीं करणार. पहा हवं तर. ओत ना पाणी. नाहीं तर तुझ्या मैत्रिणींना सांग. "
--धीर एकवटून झरा म्हणाला.
तितक्यांत वर्षाराणीच्या मैत्रिणी पण तेथें आल्या होत्या.
" हात्तिच्या ! एवढंच ना !
हें घे पाणी "--असें म्हणून झऱ्याची थट्टा करायला दोन-चार पऱ्यांनीं त्याच्या अंगावर खूप पाणी ओतलें.
वर्षाराणीनें पण एक दोन मोठाले घडे त्याच्या डोक्यावर रिकामे केले.
हंसत खिदळत त्या साऱ्या मग पुढें गेल्या.
चिमुकल्या झऱ्याला खूप आनंद झाला.
आपलें सारें पाणी सांवरीत सांवरीत तो पुढें निघाला.

वाटेंत आणखी दोन-चार झऱ्यांना बरोबर घेतलें त्यानें.
डोंगराच्या पायथ्याशीं खेडीं होतीं.



मोठ्या शिताफीनें पाणी वळवीत तो झरा खेड्यांना वळसे घालीत होता.
साऱ्या खेड्यांना किती आनंद झाला !
शेतकरी शेताकडे धांवले.
" पाणी आलं गांवाला—"
सारे जण खुषींत येऊन म्हणाले.
पाण्याचे छोटे छोटे पाट निघाले.
शेतांत पाणी खेळलें !
चिमुकला झरा आकाशाकडे पाही.
तो मनांत म्हणे,

"वर्षाराणी! किती ग चांगली आहेस तूं!"
वर्षाराणीचें आकाशाच्या अंगणांतलें काम– सारें संपत आलें.
स्वर्गांत परत जायला निघाली ती.
दसऱ्याची तयारी करायची होती तिला.
देवाघरचा दसरा!
तो का साधासुधा असणार?
आणि शरदाचें स्वागत करायचें होतें.
पुढें दिवाळी पण यायची होती.
हस्तनक्षत्र पडलें होतें.
वर्षाराणी आणि पऱ्या घरीं परत निघाल्या.
आल्या वाटेनेंच परत जात होत्या त्या.
चिमुकल्या झऱ्यानें हळूच हांक मारली,
"वर्षाराणी!"
वर्षाराणीनें झऱ्याची हांक चटकन् ओळखली.
ती म्हणाली,
"कांरे हांक मारलीस?"
झरा म्हणाला,
"तुझ्या त्या घड्यांत पाणी उरलं असेल–– तर ओत ना.
तेवढेंच तुझें ओझें हलकें!"
वर्षाराणी म्हणाली,
"एवढासा असलास तरी बराच दिसतोस कीं! मागच्या पाण्याचं काय केलंस?"
झरा अधीरपणें म्हणाला,
"पहायचंय् तुला?
चल माझ्या प्रवाहाबरोबर.
चल अशीच तुझ्या आकाशांतून उडत उडत.

पाहिलंस ?

तूं पाणी दिल्याबरोबर लगेच निघालों मी !

नि या गांवांना असे वळसे घेतले—

अगदीं जपून नि संथपणें !

जर का जरा जास्त जोरानें धांवलों असतों तर माझ्या पुरानें हीं गांवें वाहूनच गेलीं असतीं बिचारीं !

अगदीं मंद पावलें टाकीत आलों मी. माझ्या पाण्याचे जिथें तिथें पाट काढले गांवकऱ्यांनीं.

बघ जरा या राया !

कशा पानाफुलांनीं डंवरल्या आहेत !

बघ जरा हीं शेतें. मोती भरलेत यांच्या कणसांत--लाख लाख किंमतीचे ! हिरवीं पिवळीं शेतें,

नि हिरवेगार मळे पाहून आनंद नाहीं वाटत तुला ?

शेतकऱ्यांचे हंसरे चेहरे पाहिलेस ? त्यांचीं आनंदाचीं गाणीं; हिरवें भरदार गवत खाऊन गुबगुबीत झालेलीं त्यांचीं गुरें; जिथें तिथें बागडणारीं हीं पांखरें--

हे मोर ! --

यांनीं समाधान नाहीं वाटत तुला ?

आणखी थोडंच पाणी हवंय !

थोडंच ग वर्षाराणी !

नि हीं शेतें नि हे मळे आणखी बहरतील !"

सर्व पऱ्या जिकडे तिकडे आश्चर्यानें पहातच राहिल्या !

वर्षाराणीहि आश्चर्यानें पहातच राहिली !

--नंदनवनाचाच का भाग हा ?--

प्रश्न पडला त्यांना !

न राहवून वर्षाराणी म्हणाली,

“ खरंच रे ! तूं पाणी कां मागत होतास तें कळलंच नव्हतं आम्हांला ! कल्पनासुद्धां नव्हती कीं तुला असं कांहीं करायचं होतं.

पण मला सांग. माझ्याजवळ पाण्याची भीक मागतांना नी हीं गांवचीं गांवं फुलवतांना तुला स्वतःला काय मिळालं ? ”

झरा एकदम उसळून म्हणाला, “ काय मिळालं ?
वर्षाराणी ! काय मिळालं म्हणून विचारतेस ?
केवढं समाधान मिळालं तें कळायचं नाहीं तुला !
केवढा आनंद मिळाला ! —
केवढा आनंद मिळाला तें—
तुला कळायचंच नाहीं वर्षाराणी ! ”





# १० चमेली

लहानसेंच गांव होतें तें. पण फार रम्य होतें. गांवाच्या एका कडेला छोटीशी नदी नि दुसऱ्या कडेला हिरव्यागार झाडांनीं आच्छादलेल्या टेकड्या. चौफेर मऊ मऊ, लाल माती नि केळीं-नारळीच्या वाड्या. सूर्योदयाच्या नि सूर्यास्ताच्या वेळीं नारळींतून नि केळीआडून डोकावणारीं छोटीं छोटीं विटामातीचीं घरें फारच मजेदार वाटत पाहणाराला.

त्या गांवांतले आंधळेबाबा नि छोटी चमेली या दोन व्यक्ति सर्वांच्या माहितींतल्या. दोघेही भिकारी होते. आंधळेबाबा

अंध झाल्यापासून एकतारीवर भजनें म्हणून दिवस काढीत. वयस्कर होते ते नि चमेली अवघी ९-१० वर्षांची असेल, पण पोरकी !

एका पिंपळाच्या पारावर बाबांचें बिऱ्हाड होतें. बाबांची काठी, एकतारी, फाटक्या चिरगुटांचें गांठोडें नि अॅल्युमिनियमचा वाडगा व पेला एवढेच त्यांत सामान. चमेलीचे आईवडील त्या गांवच्या कसल्याशा सांथींत गमावले नि तेव्हांपासून--म्हणजे ४-५ वर्षांपासून चमेलीचा सांभाळ बाबाच करीत.

चमेली रोज सकाळीं बाबांना घेऊन नदीवर जाई. तेथें त्यांचें स्नान होई. चमेली तर पोहायला पण शिकली होती.

स्नान आटोपल्यावर बाबा वाळूंत एकतारीवर भजन करीत. चमेलीहि त्यांना साथ करी. नदीवर येणारे-जाणारे बाबांच्या वाडग्यांत क्वचित् पैसा--दोन पैसे टाकीत--तेवढाच बाबांना हातभार होई. नदीवरून परततांना, वाटेंत दोन-चार घरीं कांहीं शिळेंपाकें उरलें असल्यास चमेलीला मुद्दाम बोलावून देण्यांत येई. दुपारींहि पुन्हां असेंच कोणाकडून कांहीं मिळाल्यास मिळे नि अशी बाबांची नि चमेलीची गुजराण चाले.

चमेलीचें मन चमेलीच्या फुलाइतकेंच कोमल नि निर्मल होतें. अंगांत कोणीतरी दिलेली फाटकी बेढब चोळी नि कमरेला परकर किंवा पटकूर. केस सुरेख असले तरी न विंचरलेले. यांतूनहि तिचा काळासांवळा चेहरा उठून दिसे. दारोदार ओरडून शक्य तितकी भीक गोळा करणें चमेलीला नि तिच्या बाबांना पसंत नसे. एखाद्या दिवशीं कांहींच मिळालें नाहीं तर दोन आण्याच्या कुरमुऱ्यावरच तीं दिवस काढीत.

त्या गांवचे पाटील फार श्रीमंत होते. पाटलांचा वाडा म्हणजे सर्वांत मोठा वाडा. पाटलीणबाईंचें सोवळें भलतेंच

कडक होतें. चमेलीला त्या शिळें अन्न देण्यासाठीं वाड्याच्या फाटकाशीं चुकूनहि बोलावीत नसत. यापेक्षां गाईला तें घालण्यांत त्यांना अधिक पुण्य मिळेलसें वाटे. शिवाय त्यांच्या दृष्टीनें चमेली भिकारीणच होती. इतरांसारखी लोचट !

चमेलीला मात्र यांतलें कांहींच माहीत नव्हतें. ती बरेचदां त्यांच्या परसाच्या कुंपणाबाहेरल्या एका दगडावर रस्त्याच्या कडेला सहज बसे. कुंपणाला चिकटून असलेल्या पांढऱ्या चांफ्याच्या फुलांची फार ओढ वाटे तिला. त्यांच्या सुगंधांत



तिथें किती वेळ बसावें नि किती नाहीं, असें तिला होई. रस्त्याकडेचीं दोन-चार फुलें ती आपल्या केंसांत घाली नि

उरलेलीं कांहीं उगीचच आपल्या परकराच्या ओच्यांत गोळा करी.

परसांत पाटलीणबाई किंवा इतर माणसें कामासाठीं येत. त्यांच्याभोंवतीं पाटलीणबाईचा चार वर्षांचा राजू अंगणांत खेळे. मधेंच फाटकांतून रस्त्यावरची गंमत पाही. चमेलीची नि राजूची थोडीबहुत गट्टी जमली. ती त्याला आपल्या ओच्यांतलीं फुलें देई. राजू तिला डोळे मिचकावून दाखवी. जिभा काढून दाखवी नि मग बोबडें बोलत बोलत खूप हंसे. एकदां पाटलीणबाईंच्या हें लक्षांत आलें. चमेलीला पाहून त्या खवळल्या.

"कशाला ग आलीस इथं ? भिकारीण मेली. वर खुशाल राजूशीं खेळतेय् ! कांहीं लाज ! पुन्हा पाहिली तुला इथं तर पायच मोडीन. घाणेरडी कुठली ! "

चमेली घाबरून धूम पळत सुटली. त्या दिवसापासून ती फार घाबरायची पाटलीणबाईंना. न जाणो, नोकरांच्या हातून मारवलें विरवलें तर ? चमेली यानंतर बरेच दिवस तिकडे फिरकली नाहीं.

पण एक दिवस ती तिथून सहज जात होती. चांफा खूपच डंवरला होता. चांपयाचा मोह तिला आवरेना. ती फुलें गोळा करूं लागली नि लगेच कोणाची तरी चाहूल लागतांच पळून गेली.

नंतर चमेली पुन्हा तिथं दोन-चार दिवसांआड येऊं लागली. तिथें पुन्हा तिला बरेंचदा राजू दिसायचा नि तिला फुलें मागायचा. ती त्याच्या हातांत फुलें देऊन पसार व्हायची.

पाटलीणबाईचें तें परसूं फार छान होतें. एकीकडे नारळांनीं लदलेले चार-पांच माड, तर पलीकडे लोंगरांनीं बाजलेल्या

केळी ! परसांत चांफा होता, गुलाब होता, मोगरा होता, प्राजक्ती होती नि नेमकी चमेलीहि होती. एका कोपऱ्यांत पिण्याच्या पाण्याची विहीरदेखील होती. जरा अंतरावर अलीकडे कलमी आंब्याचें झाड असून-त्याला ओटाहि होता.

एक दिवस अशीच दुपारीं बारा-एकची वेळ होती. चमेली जेवण घेऊन पाटलीणबाईच्या दारावरून जात होती. तिच्या नेहमींच्या दगडाजवळ आज खूपच नि अगदीं ताजीं चांफ्याचीं फुलें होतीं. तिथें थांबून तिनें कांही फुलें गोळा केलीं. पाटलीणबाई तितक्यांत कशालाशा आल्या. चमेलीच्या पोटांत धस्स झालें. पण त्या घाईघाईनें लगेच आंत घरांत गेल्या. त्यांच्या मागोमाग आलेला राजू परसांत तसाच रेंगाळत होता. ओझरताच दिसला तो चमेलीला. विहिरीकडे– दूर !

दुसऱ्याच क्षणीं, 'धाड–धप्प्' असा आवाज आला ! चमेली थबकली. अवघी क्षणभरच. तिनें फाटकाची खिटी काढली. ती विहिरीकडे धांवली. धाड्दिशी विहिरींत उडी घेतली तिनें. छोटा राजू–तिचा आवडता राजू..विहिरींत पडला होता. दोन दिवसांपूर्वींच विहिरींत टाकलेलें नवें कासव पाहायला सर्वांचा डोळा चुकवून तो विहिरींत वांकला होता !

विहिरींत उडी मारतांना चमेलीच्या डोक्याला कडेचा दगड लागून खोक पडली. रक्ताचे ओघळ तिच्या तोंडावर वहात होते. तिनें राजूला एका कुशींत धरलें होतें. दुसऱ्या हातानें एका दगडाचा आधार घेऊन ती पाण्यांत पाय मारीत होती. तशीच लोंबकळून मोठमोठ्यानें ओरडत होती.

पाण्यांतला धपकन् आवाज ऐकून व चमेलीच्या ओरडण्याचा आवाज ऐकून सर्व लोक धांवले होते. कोणी तरी दोर टाकून आंत उतरले नि राजू व चमेलीला त्यांनीं बाहेर

काढलें. पडलेल्या खोकेंतून खूप रक्त गेल्यामुळें व थकल्यामुळें चमेली बेशुद्ध पडली. राजूहि बेशुद्ध होता.

डॉक्टर आणण्यांत आला. माणसें जमलीं. दोघांना शुद्धीवर आणलें. अर्धवट शुद्धींत चमेली म्हणत होती....

" राजूऽऽ... राजूला वांचवा--धांवा.... धांवा--शिवूं नका मला ...भिकारीण...बाबा !"

पाटलीणबाईच्या डोळ्यांतून घळघळ आसवें वहात होतीं. चमेलीच्या कपाळावरली मोठी थोरली खोक पाहून त्यांना गुदमरल्यासारखें होत होतें. चमेली बरी होईपर्यंत पाटलीण-बाईकडेच होती. त्या स्वतः तिची शुश्रूषा करीत. तिच्या अंध बाबांनाहि तिथेंच तिच्याजवळ आणून ठेवलें होतें. चमेली बरी झाली. पाटलीणबाई तिच्या पाठीवर हात फिरवून तिला कुशीत घेत म्हणाल्या,

" बाळ, मी फार रागवायची तुला.... आतां कध्धीं कध्धीं नाहीं रागवायची " ...गळा दाटत त्यांनीं वाक्य पूर्ण केलें.

" कध्धीं कध्धीं कध्धीं माझ्याजवळून दूर नाहीं करायची." त्यांच्या डोळ्यांतून पश्चात्तापाचे पाट वाहात होते.

चमेली त्यांचें वाक्य संपायच्या आंत एकदम म्हणाली,

" नाहीं. नाहीं. मी माझ्या बाबांना सोडून कुठेंच नाहीं रहायची. कधींच नाहीं राहायची--मी राजूशीं रोज खेळायला येईन. खरंच येईन----"

पाटलीणबाई तिच्याकडे गोंधळून बघत होत्या. चमेली उठली. वाड्यांतून पटकन बाहेर पडली. तिच्या हक्काच्या घराकडे जायला--पिंपळाच्या पाराकडे जायला.. हक्काचें घर...

ज्याला दिशांच्या भिंती होत्या----

आकाशाचें छप्पर होतें----

पिपळाच्या वृक्षाचा भरभक्कम आधार होता !
पाटलाच्या घरापासून चमेली दूर जात होती...
दूर...अगदीं दूर...
बाबा नि ती एकतारीवर गात होतीं...

*भर अंतर रे, भर प्रेमानें,*
*नको हवेल्या, चांदी, सोनें.*





## ११ ताई न् भाऊ

एक खेडें होतें. अगदींच लहानसें. तिथें एका बाजूला एक छोटीशी झोपडी होती. त्या झोपडींत दोन भावंडें राहायचीं. एक भाऊ नि एक बहीण. भाऊ १०-१२ वर्षांचा होता. बहीण १४-१५ वर्षांची होती. बहीण भावाला 'भाऊ' म्हणायची नि भाऊ बहिणीला 'ताई' म्हणायचा. ताई कोणाचं दळण करून देई. कोणाच्या गोवऱ्या थापून देई. इतर कामें करून देई. भाऊ कोणातरी शेतकऱ्याला कांहीं बाहीं मदत करी आणि कांहीं पैसे मिळवी. गुरें राखण्याचेंहि काम करी.

एकदां ताई फार आजारी पडली. आजार वाढतच चालला. कितीतरी दिवस झाले आजार हटेना. गांवांत डॉक्टर नव्हता, वैद्य नव्हता. कोणी काढा द्यायला सांगे, कोणी झाडपाल्याचा रस सांगे, पण आजार हटेना. ताईचा आजार वाढतच होता. कशानेंच गुण पडत नव्हता. ताई भयंकर अशक्त झाली. तिला बिछान्यांतून बाहेर पडवेना. खोलींत हिंडणें तर कधींच बंद झालेलें.

भाऊला चैन पडेना. कांहीं सुचेना. त्याला रडूं कोसळलें. त्याची एकुलती एक ताई आजारी पडली होती. त्याच्यावर अपार माया करणारी ताई आजारी पडली होती. तो दररोज एकटाच कामावर जाई. त्याच्याबरोबर ताई नसे. त्याला एकट्यालाच पैसे कमवावे लागत हें निराळेंच. गांवांतल्या दोघांतिघां प्रतिष्ठित शेतकऱ्यांच्या त्यानें विनवण्या केल्या. ताईला बरें करण्यासाठीं उपाय विचारलें आर्जव केलें. त्यांतल्या एकानें उपाय सुचविला. खेड्याच्या वेशीवरल्या जंगलापलीकडच्या गांवीं एक वैद्य होता. त्याच्याकडे जाऊन कांहींतरी औषध आणल्यास नक्की गुण पडेल असें त्यानें सांगितलें.

भाऊला खूप आनंद झाला आतां त्याची ताई नक्कीच बरी होणार होती. वैद्याचें औषध घेतल्यावर बरी होणार नाहीं असें होईलच कसें ! भाऊला खूप आशा वाटली. तो खूप खुषींत होता. तो धांवतच ताईकडे आला. तिला म्हणाला, "ताई ग, मी आत्तां जातों शेजारच्या गांवीं नि असं छान औषध आणतों तुला. अगदीं तावडतोब बरी होशील बघ." ताईनें त्याच्या तोंडावरून हात फिरवला. केवढ्या प्रेमानें ! त्यानें तिच्या कुशींत तोंड लपविलें. दोघांच्याहि

डोळ्यांत आंसवें होतीं. साऱ्या जगांत फक्त तेच होते एकमेकांचे. आईवडील लहानपणींच गेले होते; आणि तेव्हांपासून तेच होतें एकमेकांना आधार!

दोघां भावंडांनीं आपले डोळे पुसले. खुदकन हंसलीं तीं. मग त्यांनीं थोडचा गप्पा मारल्या. ताईच्यानें फारसें बोलवत नव्हते. भाऊ म्हणत होता, "आपण किनई फुलं व्हायला पाहिजे होतं. एका फांदीवरल्या दोन चांफेकळ्या. अवघ्या दोनच दोन. नाहींतर ताई एका डहाळीला लागलेल्या दोन कैऱ्या झालों असतों तर? किंवा ताई! आपटचाच्या पानाचीं दोन पुडं, दसऱ्याच्या दिवशीं सोनं म्हणून ऐटींत गेलों असतों लोकांच्या हातांत. नाहींतर ताई--आपण एका घरटचांतलीं दोन पाखरं झालों असतों तर ग? कोकीळाला आई बाप नसतात ना ग? मग आपण कोकीळच झालों असतों तर? तूं कोकिळा नि मी कोकीळ. एका छोटचा घरटचांत आपण किती सुंदर गाणीं म्हटलीं असतीं. मी तुला मग आवाज चढवीत चढवीत हांका मारल्या असत्या--ताई--ताई--ताई ऽऽ--ताई--ताई ऽऽ नि तूं म्हणाली असतीस, भाऊ ऽऽ उऽ भाऊ ऽऽउ!"

अशा गप्पा मारून भाऊ निघाला. खेडचालगतच्या रानांतून पलीकडच्या गांवीं जायला निघाला. वैद्याचें औषध आणून आपल्या लाडक्या ताईला लौकर बरी करायला निघाला. आणा दोन आणे करून सांठविलेले पांच रुपये त्यानें हळूच खिशांत घातले, वैद्याला द्यायचे होते ते. त्याच संध्याकाळीं औषध घेऊन परत येणार होता तो.

तिन्ही सांजा झाल्या. भाऊ अजूनहि येईना. ताईचें मन अस्वस्थ झालें. बेचैन झाली ती. खिडकीपलीकडे एक चिमणा

चिवचिव करीत होता. चिमणीला, आपल्या पिलांना, मित्र-मैत्रिणींना घरटयांत परतण्यासाठीं बोलवीत होता.

ताईच्या तोंडून क्षीण शब्द निघाले --

"जारे जा पांखरा—
बघून ये–झटकन जारे जरा.
तिनसांजाभर उलटून गेल्या
भाऊ न आला घरा–
–रे माझा–
जारे जा पांखरा—
जारे जा पांखरा
बघून ये भुर्रकन जाना जरा"

आणि सारीं पांखरें तिथून उडून गेलीं. पण त्यांतलें कोणींच परत आलें नाहीं! भाऊची बातमी सांगायला कोणीच येईना. कितीतरी वेळ ताईनें वाट पाहिली. काळजीनें नि भीतीनें तिचे हातपाय लटलट कांपत होते. हुंदके आवरत नव्हते.

ताई उठली. अंगांत अवसान आणून उठली. अंगांतलें सारें बळ एकवटून उठली. झोंपडींतून बाहेर पडली. झोकांडया खातच बाहेर पडली. थेट अंगणाच्या दिशेनें गेली ताई.

ताई खेडयाच्या कांठावर जंगलाच्या वेशींत आली कशी-बशी आणि अवघ्या पंधरावीस पावलांच्या अंतरावर तिला भाऊ दिसला. पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशांत स्पष्ट दिसला. एका चांफ्याच्या झाडाखालीं शांत झोंपलेला होता. चांफ्याच्या शेंकडों फुलांनीं पांघरूण घातलें होतें त्याला. शेंकडो फुलांच्या अंथरुणावर झोंपला होता तो.

ताई धांवली भाऊकडे. 'भाऊऽऽऽऊ!' म्हणून केवढ्या-मोठ्यांदा हाक मारली तिनें! पण--पण भाऊ उठला नाहीं.



कायमचा झोंपला होता तो. ताईनें त्याला गदगदा हलवलें. तोंच त्याच्या पायांवर एक बारीकशी जखम दिसली. तीवर रक्त सुकलें होतें. भाऊला सर्पदंश झाला होता. त्याच्या खिशांत पांचहि रुपये तसेंच होते. दुसऱ्या खिशांत वैद्याच्या पुड्या होत्या. ताईवरलें अलोट प्रेम पाहून वैद्यानें त्याला त्या फुकट दिल्या होत्या.

"भाऊ ऽऽ ऊ" ताईनें पुन्हां छाती फुटेल इतक्या मोठ्यांदा हांक मारली नि धाडकन् ती त्याच्या शेजारींच कोसळली. आपल्या भाऊशेजारींच पडली ती. त्याच्यासारखाच कायमचा विसावा घेण्यासाठीं. एका क्षणांतच तिचा देह निष्प्राण झाला तिथें. एवढ्या आजारानंतर किती वेळ लागणार त्याला!

पहांटेच्या रम्य वेळीं चांफ्याच्या सर्व फुलांनीं दोघां भावंडांवर आपली दाट पखरण पसरली. आणि समोरच्याच

मोहोरानें डंवरलेल्या आंब्यावरच्या फांद्यांत कोकिळाचीं दोन पिलें हांका मारीत होतीं. कोकिळ आवाज चढवीत चढवीत म्हणत होता—

" ताई--ताई--ताई--ताई--ताई ऽऽ "

आणि कोकिळा हांका मारीत होती —

" भाऊ ऽऽ ऊ — भाऊ ऽऽ ऊ "





१२ ⁕ ⁕ ⁕ ⁕

# सोनपंखी

भर श्रावणांतली सुंदर सकाळ. नुकताच पाऊस पडून गेलेला आहे. सुरेख कोंवळें ऊन पानापानांतून चमकते आहे. श्रावणांतला हिरवेगारपणा जिकडे तिकडे भरून राहिला आहे.

आणि अशा वेळीं एका गुलबक्षीच्या पानाखालीं आपल्या कोशांतून एक चिमुकलें फुलपांखरूं हळूंच जागें झालें. नुकतेच नवे फुटलेले आपले चिमुकले पंख त्यानें जरा उभे केले, जरा आडवे केले आणि उभे पंख्यासारखे ताठ धरले. किती किती मनोहर पंख ! आंत सोनेरी पिवळ्या रंगाचे आणि

किनारीला चौफेर हुबेहुब जरीसारख्या सोनेरी कडा असलेले ! फुलपांखरानें आपले इवले टुळटुळीत डोळे टवकारले. आपली मान इकडे वळवली. तिकडे वळवली. गुलबक्षीच्या साऱ्या कळ्या झोपल्या होत्या. संध्याकाळीं फुलायचें होतें त्यांना.

फुलपांखराला शेजारींच एक मोगरीचें फूल सुंदर फुललेलें दिसलें. त्याच्या सुवासानें इतकें वेडावलें तें, कीं त्यानें त्या फुलावर अलगद झेप घेतली. तें त्या फुलाला म्हणालें,

"फूलदादा, लागलं कारे तुला मीं मोठ्यांदा उडी मारली म्हणून ! तुझा सुवास मला फार आवडला, म्हणून पटकन् उडी मारली मीं ! "

मोगऱ्याचें फूल म्हणालें, " वेडा ! तुझ्यासारख्या नाजुक फुलपांखराचा धक्का का लागतो कधीं ?"

फुलपांखरूं पटकन म्हणालें, " अय्या ! पण मी मुलगी आहे. मुलगा नाहीं कांहीं. "

फूल म्हणालें, " हो का ! पण किती गोड आहेस तूं ! मीं कितीतरी फुलपांखरं पाहिलीं कालपासून. त्यांत तुझ्यासारखं सुरेख एकही नव्हतं. मला एक निराळंच नांव सुचलंय तुझ्या साठीं. "

फुलपांखरूं म्हणालें, " खरंच ? सांग सांग कोणतं नांव सुचलंय ?" मोगऱ्याचें फूल, हृदय उचंबळून येऊन म्हणालें,

" तुझं नांव सोनपंखी ठेवलंय मीं ! सोनपंखी ! !"

चिमुकल्या फुलपांखराला केवढा आनंद झाला. " सोनपंखी " तें आपल्याशींच दोनतीनदां पुटपुटलें.

मोगऱ्याच्या फुलाचा निरोप घेऊन बागडतच निघालें तें फुलपांखरू ! " सोनपंखी ! सोनपंखी ! ! " आपल्याशींच तें

बडबडत होतें. केवढा निरागस आनंद होता त्याच्या उडण्यात नि बागडण्यांत !

शेजारची प्राजक्ती पांढऱ्या शुभ्र फुलांनीं भारून गेली होती. सोनपंखी प्राजक्तीच्या झाडाभोंवतीं मनसोक्त खेळली. कितीतरी गोलगोल गिरक्या घेतल्या तिनें. प्राजक्तीचा नाजुक सुवास नि नाजुक फुलें केवढीं आवडलीं तिला ! शेवटीं जरा विसावा घेण्यासाठीं ती एका फुलेंभरल्या डहाळीवर थांबली ! डोळे अर्धे मिटून प्राजक्तीच्या सुवासांत गुंगत पडलेलीं अशी. ती डहाळी एका पडक्या भिताडावर टेकली होती.

"टर्रंक–टर्रंक"-- सोनपंखीला आवाज ऐकूं आला. आपले अर्धमिटले डोळे पटकन उघडले तिनें. तिच्या अगदीं जवळ, त्या भिताडावर, मोठ्या डोक्याचा, चार पायांचा नि लांब शेपटीचा एक प्राणी तिला दिसला. सोनपंखी घाबरून ओरडली, "बाप रे !" पण शब्दच ओठांतून निघेनात तिच्या ! ती तिथून उडून पळून जाणार तोंच तो प्राणी म्हणाला,


"थांब, थांब. किती सुंदर दिसतेस तूं. नांव काय तुझं !"

"माझं ? माझं नांव सोनपंखी !" धीर एकवटून सोनपंखी म्हणाली.

"सोनपंखी ? चांगलं आहे नांव. माझं नांव सांगू ? मला 'सरडा' म्हणतात." तो प्राणी म्हणाला.

"असेल बाई ! पण मी जातें आतां." सोनपंखी जायच्या तयारींत म्हणाली. सरड्याला पाहून तिची गाळण उडाली होती. पण सरडा तिला अडवीत म्हणाला, "जरा थांब कीं. हा तुझा एकच सोनेरी पिवळा रंग आहे पण मी तर अनेक रंग बदलतों. पिवळा, हिरवा, लाल, शेंदरी,जांभळा कोणताहि रंग असतो माझा."

" हो का ?  असेल बाई तसं. पण तुझं तें मोठ्ठं डोकं नि चेहरा मला नाहीं बाई आवडत. भारी भीति वाटते मला." सोनपंखी मधेंच म्हणाली. सरडा म्हणाला, " वा ! वेडीच आहेस. अग, या मोठ्या डोक्यांतला मेंदूहि मोठाच आहे. आणि मोठ्या मेंदूंतली अक्कलहि मोठीच असणार हें कसं नाहीं कळत तुला ? हें तर विद्वानांनाहि कबूल करावं लागेल. लहानशा डोक्यांतल्या लहान अकलेचा काय उपयोग ? आणि म्हणूनच म्हणतों कीं, माझ्याशीं लग्न करण्याचा जरा विचार करून पहा. या सबंध भिताडाची मालकीण होशील तूं. शिवाय माझी मोठी अक्कल वापरून तुला सर्व संकटा-पासून दूर ठेवीन मी. माझ्यासारखा मोठ्या अकलेचा नवरा तुला कुठेंच मिळणार नाहीं...."



“नको ग बाई–मी नाहीं ऽ ऽ” सोनपंखी उद्गारली. तो पुढें कांहीं बोलायच्या आंतच तिथून उडाली ती. पण सरड्याला तो फार मोठा अपमान वाटला. तो दांत ओठ खात तिच्या मागें धांवला. “चिरडून टाकीन तुला. काय समजलीस तं.” तो म्हणत होता.

कशीबशी जीव बचावीत सोनपंखी एका छोटचा ओहोळाशीं आली. सरडा मागोमाग पाठलाग करीतच होता. सोनपंखीनें जी उंच झेप घेतली ती ओहोळाच्या थेट पलीकडे. एका हिरवळीच्या झुपक्यांत.

आतां बाकी सरड्याचं कांहींच चालेना. सरडा अलीकडेच ओहोळाशीं एका दगडावर स्वस्थ बसला. त्याला सोनपंखीची उंच झेप येणेंच शक्य नव्हतें.

“माझ्या मोठ्या अकलेचा फारसा उपयोग कां झाला नाहीं ?” तो मनांत स्वतःलाच विचारूं लागला.

सोनपंखी अजूनहि त्या हिरवळींत थरथरत बसली होती. एक मैना आसपास सहज फिरत होती. सोनपंखीनें तिला हळूच हांक मारली.

“मैनाताई”

“इवल्या फुलपांखरा, काय हवंय ? नांव काय तुझं ?” मैनाताई सोनपंखीच्या जवळ जात म्हणाली.

सोनपंखीनें आपलें नांव सांगितलें. सारी हकीकत सांगितली. तें सांगतांना मोगरीच्या फुलाची आठवण येऊन किती हुंदके आले तिला !

मैनाताई म्हणाली, “अगदीं घाबरूं नकोस. समोरच्या झाडावर माझं घरटं आहे. चल तिथें राहायला. खुशाल रहा

माझ्याबरोबर. समोर पलीकडे डोंगर आहेत. त्यांच्या घाटांत आपण रोज फिरायला जात जाऊं. मजेंत हिंडूं, मजेंत गाऊं. चल तूं."

सोनपंखी नि मैनाताई रोज खूप हिंडायच्या. मैनाताई तिला सुंदर गाणीं शिकवी. सोनपंखीचा आवाज इतका गोड, नाजुक नि बारीक होता कीं, तो अगदीं जवळ असलेल्या मैनाताईलाच फक्त ऐकूं येई. मैनाताईला किती आवडे तो !



गाणीं गात दोघी तासचे तास घाटांत फिरत. हिरवेगार डोंगर, विरळ धुक्यानीं त्यांच्या झाकलेल्या पायवाटा नि डोंगरमाथे झांकणारे पोकळ ढगांचे सुंदर रेशमी शेले हीं सोनपंखीला फार आवडत. आणि उंचावरून खालीं कोसळत येणारे ओहोळ ! जणूं ढगांच्या कलशांतून, कोणीं वनपऱ्या रेशमाचा रुपेरी रस ओततात जशा ! किती सुंदर दिसत त्या रेशीमधारा ! आणि चौफेर फुललेलीं श्रावण-भाद्रपदांतलीं रंगीबेरंगी फुलें. त्यांच्या सुगंधानें सारे घाट भरून जात. आणि त्या सुगंधांत मैनाताई नि सोनपंखी दंग होऊन जात. मध्येंच पाऊससरी थांबल्यावर कोंवळीं उन्हें चमकूं लागलीं कीं सारा

देखावा इतका रम्य दिसे! इतर फुलपांखरांबरोबर नि छोटचा-छोटचा चिमण्यांबरोबर सोनपंखी मनसोक्त खेळायची मग. संध्याकाळ होत आली किंवा पाऊस पडूं लागला कीं मैनाताई सोनपंखीला घेऊन घरीं येई.

पण एक दिवस, दसरा झाल्यावर खूप गोंधळ झाला. मेघांचा प्रचंड गडगडाट झाला. विजा कडाडल्या, लखलखल्या, सुसाट वारा--प्रचंड तुफान--भयंकर वादळ! झाडें कडाकड मोडून पडलीं-- डोंगराचे कडे कोसळले--डोंगरकडचांवरून ओघळणाऱ्या जलधारा--वेडचासारख्या सैरावैरा धावूं लागल्या.

मैनाताई नि सोनपंखी एकमेकींना शोधत फिरत होत्या. पण, पण त्यांची ताटातूट झाली!

पावसाच्या माऱ्यांत नि अंधारांत सोनपंखीचा निभाव लागेना. ती कशी बशी एका डोंगरकपारीच्या आडोशाला थांबली. ओली चिंब झालेली, पंख विस्कटलेली आणि अर्ध मूर्च्छित अशा अवस्थेंत!



कपारीच्या त्याच खबदाडीत एक गोगलगाय बिलगून बसली होती. कसा बसा आपला जीव सांवरीत होती. तिनें सोनपंखीला पाहिलें. आपल्या सोंडेनें तिला पाणी पाजलें. खबदाडींतल्या कोरड्या पाचोळ्यांत उबेसाठीं सोनपंखीला निजविलें. गोगलगाय सोनपंखीची रोज शुश्रूषा करी आणि त्या दुखण्यांतून बरें व्हायला सोनपंखीला तब्बल चार महिने लागले.

या चार महिन्यांत हिंवाळाहि संपत आला होता, नि वसंतऋतूमुळें सारें पुन्हां उल्हसित झालें होतें.

कोकिळाचें गाणें, मोरांचा टहुकार नि पांखरांची किलबिल ऐकून सोनपंखीला आपल्या खबदाडींत बसवेना. ती एक दिवस बाहेर आली. किती सुंदर होतें सारें ! जिकडे तिकडे रंगच रंग ! फुलांचे, पानांचे, पांखरांचे नि आकाशाचे देखील! समोरच एक चिमुकलें जलाशय होतें. त्यांत सुरेख पांढरीं कमळें होतीं. सोनपंखी अलगद त्यांतल्या एकावर बसली. पण इतक्यांत —

कमळांत झोंपलेला भुंगा तिच्या चाहुलीनें जागा झाला, व गुंऽऽ करून त्यानें एक गिरकी घेतली. सोनपंखी भ्याली. त्यानें लगेच दरडावून तिला विचारलें, "कां झोंप मोडलीस माझी ?"

"मला माहीत नव्हतं तूं तिथं आहेस तें. चूक झाली माझ्या हातून." सोनपंखी दीनवाणी म्हणाली.

"बरं बरं ! आणि तशी तूं सुंदरहि दिसतेस. माझं नांव भुंगा. मी या सर्व कमळांचा नि जलाशयाचा राजा आहें. काय समजलीस ? तूं ज्या अर्थीं इथं आली आहेस त्या अर्थीं

माझ्याशीं लग्न करून माझी राणी बनायला तुला कांहींच हर-कत नाहीं. कबूल ? ”

“ नको नको, नाहीं नाहीं. ” सोनपंखी एकदम घाबरून म्हणाली. थरथरूंच लागली ती.

“ कां नाहीं. एवढ्या मोठ्या राजाशीं लग्न करायला तूं लायक नाहींस असंच ना म्हणणं ? ” भुंग्यानें ऐटींत विचारलें.



“ नाहीं. तसं नाहीं. तूं फार काळा काळा आहेस नि कमळांचा रस, शोषून शोषून निर्जीव करतोस त्यांना. आणि तुझा तो कर्कश आवाज.... ” सोनपंखी मागें मागें जात म्हणाली आणि लगेच तेथून पळत सुटली.

भुंग्याला भयंकर अपमान वाटला तो. त्यानें जोरांत तिचा पाठलाग केला. पण नेमके त्याच वेळीं इतके दिवस ताटातूट झालेल्या मैनाताईला सोनपंखीनें पाहिलें. ती तिच्या पंखाआड तिच्या कुशींत शिरलीं. भुंगा चडफडत परत गेला.

बिचारी सोनपंखी खूप रडली. नि मैनाताई भेटली म्हणून तर अधिकच उमाळा आला तिला. मैनाताई म्हणाली,

" चला, आपण लांब पलीकडे जाऊं. त्या खालच्या मैदानांत. तिथें आंब्याची राई आहे. तिथंच एका झाडावर मी माझं घरटं करीन. तूंहि तिथंच राहा माझ्याजवळ, पुन्हा मागच्या सारखी. आपण वसंताचीं गाणीं गाऊं. कोकिळाला साथ करूं आणि मजेंत खूप हिंडूं...."


सोनपंखी आपले डोळे मोठाले करून तिच्याकडे पाहात मधेंच म्हणाली, " खरंच ? "

मैनाताई म्हणाली,

" अगदीं खरंच. मजेंत हिंडूं ...सुंदर सुंदर कळ्यांतून, नव्या फुटल्या पालवींतून, गोंडस रंगदार तुऱ्यांतून. इवल्या कळ्यांना गोष्टी सांगूं, पालवीशीं गप्पा मारूं, रंगदार तुऱ्यांशीं लपालपी खेळूं. "

सोनपंखीला खूप आनंद झाला. दोघी धांवतच डोंगर-पायथ्याच्या मैदानाकडे गेल्या. किती सुंदर राई! मोहोराचा वास वेड लावीत होता जसा. आंब्याची हिरवी तांबडी नवी पालवी पाहून सोनपंखी नाचायलाच लागली. जिथें तिथें पळाशीचीं झाडें फुललीं होतीं. अगदीं भरगच्च. त्यांच्या लाल-शेंदरी तुऱ्यांवर सोनपंखी खूप बागडली. तो रंग तिला फार आवडला. मैनाताईनें एका झाडावर एक चिमुकलें घरटें बांधलें. सोन-पंखी तिच्याबरोबर मजेंत राहूं लागली.

समोरच्या छोट्या मैदानांत एका उंच बांधाच्या कडेला एका कोपऱ्यांत एका गुलाबाच्या रोपाला एक फूल आलें. लाल गुलाबी रंगाचें, कमालीचें मोहक! सोनपंखी तें पहायला धांवली. इतकें मोहक नि सुवासिक फूल तिनें कधीं पाहिलें नव्हतें. सोनपंखीनें दोन तीन गिरक्या घेतल्या त्या फुला-भोंवतीं नि त्याच्या मखमली पाकळ्यांवर अलगद गाल टेकला तिनें! किती मऊ मऊ पाकळ्या!



फूल अगदीं हलक्या आवाजांत म्हणालें, "झोंप आली तुला? माझ्या खांद्यावर खुशाल मान टेक. तुला हवं तितकं खेळ इथं नि कंटाळा आला कीं खुशाल जा तुला आवडेल तिथं. माझ्या मऊ पाकळ्यांनीं थोपटूं का तुला? मी तुला फुलराणीच्या

गोष्टी सांगेन, कोकिळेनें शिकवलेलीं सारीं गाणीं गाईन. आणखी तुला काय देऊं सांग ? "

"पण, पण मला इथं कोणीं त्रास नाहीं ना देणार ?" तूं सुद्धां नाहींना ?" सोनपंखीनें भीत भीत विचारलें. "वेडी ! अग तुला त्रास द्यायला कोणीं आलंच तर माझ्या कांट्यांनीं त्याच्या चिंधड्या उडवीन मी. आणि मी कशाला तुला त्रास देऊं ? तूं माझ्याकडे आलीस हेंच माझं भाग्य !" गुलाब म्हणाला.

सोनपंखीला केवढा आनंद झाला पण ! तिनें सारा दिवस त्या फुलाशीं गप्पा मारल्या. ती नाचली, बागडली. मैनाताईनें शिकवलेलीं गाणीं म्हणाली नि फुलाभोवतीं सारा दिवस पिंगा घातला तिनें. भूक नाहीं, तहान नाहीं, झोंप नाहीं ! तिचा आनंद कुठेंच मावेना !

संध्याकाळीं खूप खूप दमून त्या गुलाबाच्या पाकळ्यांवरच अलगद झोंपून गेली ती. उपाशींच !

दुसरे दिवशीं गुलाबाचें फूल पूर्ण उमललें. सोनपंखीच्या भेटीचा खूप खूप आनंद झाला होता त्याला.

मैनाताई बाजूनें उडत जातांना स्वतःशींच म्हणाली, "शेवटीं हिच्यासारखंच कोणीतरी मिळालं हिला खेळायला. आजपर्यंत किती हाल झाले बिचारीचे !"

सोनपंखी त्याहि दिवशीं खूप खुषींत होती. आज तर जास्तच गप्पा मारल्या तिनें त्या फुलाशीं. फूलदादाच्या, प्राजक्तीच्या, सरड्याच्या नि भुंग्याच्या ! आजहि ती तहान भूक सारेंच विसरली. तिच्या नव्या मित्राशीं किती बोलूं नि किती नाहीं

असें झालें होतें तिला! दिवस संपला. सोनपंखी गुलाबाच्या मखमली पाकळ्यांत मान टेंकून अलगद झोंपून गेली!

सोनपंखी पहांटेच जागी झाली. आनंदांत तिनें आपली मान गुलाबाच्या खांद्यावरून वर उचलली. ती हंसत त्याच्याकडे पाहूं लागली. आनंदांत दोनचार गिरक्या घेतल्या त्याच्या भोंवतीं तिनें. ती त्याच्याशीं गप्पा मारूं लागली. ती मधेंच म्हणाली,

" आज तूं काल परवांसारखा बोलत कां नाहींस माझ्याशीं? रागावलास माझ्यावर ? मी तुला फार त्रास दिला का रे ?"

" नाहीं ग, तुझ्यासारख्या निरागस, निष्पाप मुलीवर कोण रागावेल? पण-पण-आज किनई मला बोलवत नाहीं. फुलाला तीनच दिवसांचं आयुष्य असतं. पहिले दिवशीं उमलणं, दुसरे दिवशीं फुलणं नि तिसरें दिवशीं कोमेजणं!" गुलाब निश्वास टाकून कसें बसें म्हणाला.

सोनपंखी एकदम किंचाळली—

" नको-नको-नको असं बोलूंस." ती ओक्साबोक्शीं रडत सुटली. गुलाबाला गच्च मिठी मारली तिनें. " मी-मी तुला कधींच माझ्याजवळून दूर जाऊं द्यायची नाहीं, कधींच नाहीं. कधींच नाहीं..." ती आक्रंदून सांगत होती.

शेजारीच असलेल्या मैनाताईच्या डोळ्यांत आसवें तरारलीं.

सारा दिवस सोनपंखी तिथेंच बसून होती. गुलाबाला गच्च मिठी मारून! कडकडीत उपाशी—पाण्याचा थेंबहि न घेतां! तशी तीन दिवसाची उपाशीच होती ती. आक्रोशानें सुकून गेली होती, गुलाबाइतकीच मलूल झाली होती.

तिन्हीसांजा झाल्या. सूर्य आपल्या अंधाऱ्या गुहेकडे जाण्याची तयारी करीत होता. सारीकडे उदास वाटत होते. मैनाताईच्या गालांवरून आंसवें ओघळत होतीं आणि तेव्हांच गुलाबाचें फूल पूर्ण मलूल झालें आणि त्याच क्षणीं--

सोनपंखीनें आपलें सुंदर सोनेरी पंख त्या फुलावर सपाट पसरून दिले. तिचाहि आत्मा तिचा इवलासा देह सोडून निघून गेला !

आणि त्याच क्षणीं—

आकाशांत चहूंकडे सुंदर सोनेरी लाल छटा पसरल्या !

आंसवें भरल्या डोळ्यांनीं त्या अपूर्व छटांकडे पाहात मैना-ताई म्हणाली....

" गुलाब नि सोनपंखीच ते ! "



श्रीमती सुमति पायगांवकर यांनी बालसाहित्यासाठी हयातभर लेखन केले.
या त्यांच्या कारकिर्दीत
'सर्वोत्तम बालसाहित्यिक' म्हणून
केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने
त्यांच्या अनेक पुस्तकांना सर्वोत्कृष्ट बालसाहित्य म्हणून
पारितोषिके दिले आणि गौरव केला.
अशी ही सर्वोत्तम पुस्तके आम्ही प्रकाशित करीत आहोत.
शासनमान्य, राजमान्य आणि आता लोकमान्य
अशी ही पुस्तके सर्वांनाच आवडतील.
आणि सर्वमान्य होतीलच.
विशेषत: हा उपक्रम ४ थी - ५ वी पर्यंतच्या
बालकुमारांसाठी मुद्दाम प्रकाशित केलेला आहे.
'सर्वोत्कृष्ट बालसाहित्य' संचामध्ये
प्रकाशित झालेली पुस्तके
आणि
पारितोषिकांचा तपशील.

(१) स्वप्नरेखा भाग – १
(२) स्वप्नरेखा भाग – २
राज्य शासन उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार ७०-७१
(३) सोनपंखी भाग – १
(४) सोनपंखी भाग – २
राज्य शासन उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार ६३-६४
(५) कावळेबांच्या जमती - राज्य शासन उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार ६२-६३.
(६) रानगावची आगगाडी - केंद्र शासन उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार ६०-६१
(७) चाफ्याची फुले - राज्य शासन उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार ५७-५८
(८) बदकूताईचा कॅक् कॅक् - केंद्र शासन उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार ५७-५८.

BVBK-0402470